# आंतरराष्ट्रीय योगदिन २०२० अहवाल

दिनांक २१ जून २०२० रोजी आंतरराष्ट्रीय योगदिनानिमित्त एमइएस आयुर्वेद महाविद्यालयातर्फे योग प्रचार, प्रसार व जनजागृती संदर्भात विविध कार्यक्रम राबविण्यात आले. आंतरराष्ट्रीय योग दिनासंदर्भातील विविध कार्यक्रमामध्ये महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी सहभागी होते. योगदिनानिमित्त कार्यक्रमामध्ये महाविद्यालय परिसरातील नागरिकांचा सहभाग उल्लेखनिय होता. विविध कार्यक्रमाची माहिती खालील प्रमाणे आहे.

**आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त ऑनलाइन स्पर्धेचे आयोजन**

सहाव्या योग दिनाचे औचित्य साधून महाविद्यालयातील स्वस्थवृत्त विभागामार्फत रांगोळी, भित्तीपत्रके, निबंध स्पर्धा तसेच योग प्रात्यक्षिक स्पर्धा यांचे ऑनलाईन माध्यमातून स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धांमध्ये विद्यार्थी, अध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच महाविद्यालयाशी संलग्न परशुराम हॉस्पिटल व संशोधन केंद्र यांमधील कर्मचारी सहभागी झाले होते. सदर स्पर्धांचा निकाल लवकरच जाहीर करण्यात येईल.

**रांगोळी स्पर्धा**







**भित्तीपत्रक स्पर्धा**






**निबंध स्पर्धा व योग प्रात्यक्षिक स्पर्धा**



पृ.क्र. १

निबंध स्पर्धा

विषय - योग आणि कोविड-१९

डॉ. प्रदीप आ. रांगळे

३१ डिसेंबर २०१९ च्या रात्री जेव्हा आपण येणाऱ्या नववर्षाचे जंगी स्वागत करण्यासाठी सज्ज होतो तेव्हा कुणाला ठाऊक होतं की, येणारे २०२० हे नववर्ष; वर्षाच्या सुरुवातीलाच आपल्यासाठी कोरोना रूपी भेटवस्तू घेऊन येणार आहे. जनपदोध्वंस हा शब्द केवळ कानाने ऐकणाऱ्या आधुनिक पीढीला त्याचे खरे रौद्ररूप या कोविड-१९ च्या निमित्ताने अनुभवायला मिळाले.

चीनमध्ये उगम पावलेल्या या कोविड-१९ ने बघता बघता संपूर्ण जगामध्ये आपले साम्राज्य पसरवले. जाती, धर्म, वय, आर्थिक परिस्थिती इत्यादि कुठल्याही गोष्टीचे बंधन न पाळता या महामारीने संपूर्ण विश्वाला ग्रासले. अर्थातच भारत सुद्धा याला अपवाद राहीला नाही. आज दि. १५/०६/२०२० रोजी आपल्या देशात कोविड-१९ ने बाधित एकूण रुग्णसंख्या जवळपास ३,५५,००० एवढी आहे व या महामारीमध्ये मृत्युमुखी पडलेल्यांची संख्या जवळपास १२,००० एवढी आहे.

---क्रमशः



**प्रश्नमंजुषा उपक्रम**

योग या विषयाचे महत्त्व सर्वसामान्य लोकांपर्यंत पोहोचावे या उद्देशाने एमइएस आयुर्वेद महाविद्यालयातर्फे प्रश्नमंजुषा ऑनलाइन स्वरूपात उपलब्ध करून देण्यात आली होती. सदर प्रश्नमंजुषामध्ये महाराष्ट्रातील विविध भागातील सामान्य नागरिक तसेच गोवा, गुजरात, मध्य प्रदेश इत्यादी राज्यांमधील नागरिकांनी सहभाग नोंदविला. सदर उपक्रमांमध्ये तेराशे पेक्षा जास्त नागरिकांचा सहभाग होता.



Questions Responses 1,291 Total points: 30

आंतरराष्ट्रीय योग दिवस २०२० - प्रश्नमंजुषा

On Occasion of 6th International Yoga Day

Email address *

Valid email address

This form is collecting email addresses. Change settings

Name of the participant *

Short answer text

Contact Number *

Short answer text

**वेबिनार आयोजन**

एमइएस आयुर्वेद महाविद्यालयाच्या स्वस्थवृत्त विभाग राष्ट्रीय सेवा योजना विभाग तसेच Academic Excellence Committee यांच्यामार्फत दिनांक २१ जून २०२० दुपारी ०३ ते ०४ या वेळेत दरम्यान वेबिनारचे आयोजन करण्यात आले होते. सदर वेबिनार मध्ये **Yoga for Positive Health** या विषयावर डॉ. मानसी बावडेकर, योगतज्ञ, योगविद्या निकेतन, मुंबई यांचे मार्गदर्शन लाभले. सदर वेबिनार मध्ये महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थी सहभागी होते.




**महाविद्यालयाच्या You tube Channel वर योग विषयक चित्रफित प्रकाशित**

सद्य परिस्थितीत कोरोना या विषाणूचा प्रादुर्भाव असल्याने महाविद्यालयातील विद्यार्थी तसेच परिसरातील नागरिक यांच्यासाठी **Yoga Protocol for Respiratory Immunity** या विषयावरील चित्रफीत महाविद्यालयातील You tube Channel वर प्रकाशित करण्यात आली होती. सदर चित्रफित दोनशेहून अधिक लोकांनी २१ जून रोजी पाहिली.

**Yoga for Home and Yoga with Family** या संकल्पनेतून महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांनी आपल्या कुटुंबासमवेत योग दिन उत्साहात साजरा केला. आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त एमइएस आयुर्वेद महाविद्यालयातून सुमारे २०० पेक्षा जास्त कुटुंबे सहभागी होती.

तसेच शासनाचे कोविड-१९ संदर्भातील सर्व नियमांचे पालन करून महाविद्यालयामध्ये योग प्रात्यक्षिक वर्ग निवडक व्यक्तीच्या उपस्थितीत संपन्न झाला.


SHOT ON MI A3
SAI
2020/6/21 07:58


SHOT ON MI A3
SAI
2020/6/21 08:03

एमइएस आयुर्वेद महाविद्यालयातील अध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी Yoga for Home and Yoga with Family या संकल्पनेतून आंतरराष्ट्रीय योग दिवस साजरा करताना

























SHOT ON MI A3
SAI
2020/6/18 16:06








REDMI NOTE 6 PRO
MI DUAL CAMERA
2020/6/21 09:40